पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या साररव्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
दैनिक
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

3 ऱ्या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३०१ वा ● सोमवार, ता. ५ मे २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## व्यंगचित्रकार हा समाजाचा जागल्या - गौरव सर्जेराव

### व्यंगचित्र शिकूया कार्यशाळा संपन्न



**सांगली | प्रतिनिधी**

व्यंगचित्रकार आपल्या चित्रातून समाजाच्या चुकीच्या गोष्टीतील व्यंग पकडून त्यावर भाष्य करतो. व्यंगचित्रकार हा समाजाचा जागल्या असतो असे प्रतिपादन व्यंगचित्रकार गौरव सर्जेराव यांनी केले. ते अंधश्रद्धा निर्मूलन समिती सांगली यांच्या वतीने आयोजित विवेक रेषा व्यंगचित्र प्रदर्शनानिमित्ताने आयोजित चला व्यंगचित्र शिकूया या कार्यशाळेमध्ये बोलत होते. या कार्यशाळेचे उद्घाटन अंनिसच्या विवेक रेषा या विशेषांकाचे प्रकाशन करुन झाले. व्यंगचित्रकार गौरव सर्जेराव पुढे म्हणाले, एखादे व्यंग समजण्यासाठी निरीक्षण महत्त्वाचे असते आणि चित्र काढण्यासाठी सराव महत्त्वाचा असतो.

या दोन्ही मधून व्यंगचित्र तयार होते. व्यंगचित्रातून अवघड गोष्ट सोपी करून विनोदी पद्धतीने सांगता येते. त्यामुळे लोकांना व्यंगचित्र भावते. समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा परंपरा यामध्ये व्यंगाचा अनेक जागा असतात. या समाजाला व्यंगचित्रांच्या माध्यमातून दाखवल्या तर त्यांचं प्रबोधन करणे सोपे होईल दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध ॲनिमेटर जयेश दळवी यांनी ॲनिमेशनचे तंत्र आणि विज्ञानाची सोप्या भाषेत मुलांना माहिती दिली. अर्ध्या तासाच्या ॲनिमेशन फिल्मसाठी तब्बल ३५ लाख चित्रे काढावी लागतात असे त्यांनी सांगितले. तिसऱ्या सत्रात ओमकार बागवे यांनी कॉमिक्स तयार करण्यामागचे तंत्र शिकवले. चौथ्या सत्रात व्यंगचित्रकार रोहित कबाडे म्हणाले, राजकीय विसंगतीवर व्यंगचित्रे जास्त काढली जातात, पण समाजातील अनिष्ट प्रथेविरोधात व्यंगचित्र काढण्यासाठी धाडस लागते. व्यंगचित्रांचा उपयोग समाज प्रबोधनासाठी कसा करता येईल याबाबत कबाडे यांनी मार्गदर्शन केले. ज्येष्ठ विचारवंत प्रा. बाबुराव गुरव यांनी व्यंगचित्र प्रदर्शनास भेट दिली. त्यावेळी ते म्हणाले, भारतभरातील दीडशे व्यंगचित्रकारांनी अंधश्रद्धा निर्मूलनावर व्यंगचित्रे काढून चळवळ गतिमान करण्यासाठी मोठी मदत केली आहे. चळवळीतील कार्यकर्त्यांनी ही नवी माध्यमे चळवळीत वापरली पाहिजेत.

कार्यशाळेसाठी सांगली, कोल्हापूर, सातारा, पुणे येथून ६० विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते. कार्यशाळेमध्ये गौरव सर्जेराव यांनी उपस्थितांची सुंदर व्यंगचित्रे काढून वाहवा मिळवली. सुत्रसंचलन राहुल थोरात यांनी तर स्वागत वाघेश साळुंखे यांनी केले. तर चळवळीची गाणी त्रिशला शहा, आशा धनाले यांनी गायली. कार्यशाळेचे संयोजन डॉ. संतोष अक्कोळे, जगदीश काबरे, प्रविण कोकरे, सुहास यरोडकर, मालोजीराजे माने, सरिता पाटील, स्मिता मुलाणी, सचिन करगणे यांनी केले.



## देशातील पहिले संपूर्णपणे महिलांकडून संचलित 'ईट राईट स्ट्रीट फूड हब' मुंबईत सुरू

**मुंबई | गुरूदत्त वाकदेकर**


देशातील पहिले संपूर्णपणे महिलांकडून संचलित 'ईट राईट स्ट्रीट फूड हब' मुंबईत सुरू करण्यात आले आहे. अन्न आणि औषध प्रशासन, बृहन्मुंबई विभाग यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने, माहिम रेतीबंदर येथे स्वयंसहायता गटाच्या सदस्य असलेल्या महिलांकडून भारतातील पहिले संपूर्णपणे महिलांकडून संचलित 'ईट राईट स्ट्रीट फूड हब'सुरू करण्यात आले आहे. यावेळी अन्न व औषध प्रशासन राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, प्राप्त संधी आणि प्रशिक्षण यांच्या आधारे तळागाळातील महिला स्वयंसहायता गटातील महिला देशातील अन्न सुरक्षा मानकांना परिभाषित करू शकतात, याचे माहिम सीफूड प्लाझा हे एक उत्तम उदाहरण आहे. 'ईट राईट स्ट्रीट फूड हब' या परिवर्तनशील उपक्रमात महाराष्ट्र देशाचे नेतृत्व करत असल्याचा अभिमान आहे, अशा शब्दात राज्यमंत्री योगेश कदम यांनी उपक्रमाचे कौतुक केले. या उपक्रमाचा प्रमाणपत्र वितरण समारंभ ता. २ मे रोजी माहिम येथे आयोजित करण्यात आला. राज्यमंत्री कदम यांच्या हस्ते महिला स्वयं सहायता गटांच्या एकूण १५३ महिलांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाला अन्न व औषध प्रशासन आयुक्त राजेश नार्वेकर, बृहन्मुंबई विभागाचे सहआयुक्त (अन्न) मंगेश माने उपस्थित होते.

## आज ५ मे रोजी १२ वी परीक्षेचा निकाल

**पुणे | प्रतिनिधी**

फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र म्हणजेच इ.१२ वी परीक्षेच्या निकाल लागणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी दिली.

शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र म्हणजेच इ.१२ वी परीक्षेचा निकाल सोमवारी ता. ०५ मे, २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता




ऑनलाईन जाहीर करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी सोमवारी ता. ०५ मे, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता राज्य मंडळ कार्यालयात पत्रकार परिषद आयोजित केरण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

एचएससीचा निकाल पाहण्यासाठी हा क्युआर कोट स्कॅन करा



## इनफ्लुएंसर्सने स्वतःची खरी ओळख जपणे गरजेचे- सिन्हा

**मुंबई | प्रतिनिधी**

समाजमाध्यमांतील इनफ्लुएंसर्सने स्वतःची खरी ओळख जपणे गरजेचे असल्याचे मत 'बेस्ट प्रॅक्टिसेस फॉर सोशल मीडिया ॲडव्हर्टायझिंग फॉर इन्फ्लुएंसर' या परिसंवादात व्यक्त करण्यात आले.

बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटरमध्ये आयोजित वेव्हज २०२५ दृकश्राव्य आणि मनोरंजन समिटमध्ये या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सहभागी सहेली सिन्हा म्हणाल्या, इन्फ्लुएंसरने जबाबदारीने विविध ब्रँडसोबतची भागीदारी केली पाहिजे. ब्रँडसोबत केलेली भागीदारी ही केवळ जाहिरात करणे एवढेच नसून ती एक मोठी जबाबदारी आहे. कारण ग्राहक प्रभावी व्यक्तींवर विश्वास ठेवून त्यांनी जाहिरात केलेल्या गोष्टी विकत घेत असतात. त्यामुळे इन्फ्लुएंसरने स्वतः त्या गोष्टीची माहिती, अनुभव घेऊन मगच त्याबाबत इतरांना सांगण्याची पारदर्शकता जोपासणे आवश्यक आहे. जाहिरात करताना नेहमी अटी व शर्ती आणि त्या-त्या समाज माध्यमांचा वापर करण्यासाठीच्या सूचना, नियमावली पाळण्यास प्राधान्य दिले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. शिबानी अख्तर यांनी समाजमाध्यमांतील इन्फ्लुएंसरने प्रामाणिकपणास महत्त्व द्यावे. प्रामाणिक कंटेंट दीर्घकाळ टिकतो आणि विश्वास निर्माण करतो. आरोग्यासारख्या संवेदनशील विषयांवर ब्रँडिंग करताना विशेष सतर्कता बाळगली पाहिजे, असेही यावेळी सांगितले.

## टॅरिफ युद्ध ही भारतासाठी सुसंधी- डॉ.देवळाणकर

### छत्रपती शिवाजीमहाराज व्याख्यानमालेचे तृतीय पुष्प

**पिंपरी | प्रदीप गांधलीकर**

अमेरिकेने सुरू केलेले टॅरिफ युद्ध ही भारतासाठी सुसंधी आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय राजकारणाचे विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, पेठ क्रमांक २५, निगडी प्राधिकरण येथे शनिवारी ता.३ मे रोजी केले. स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ आयोजित चार दिवसीय छत्रपती शिवाजीमहाराज व्याख्यानमालेत अमेरिकन टॅरिफच्या भयकंपाचे वास्तव या विषयावर तृतीय पुष्प गुंफताना शैलेंद्र देवळाणकर बोलत होते. हिंदुत्ववादी कार्यकर्ते आनंद रायचूर, इंद्रायणी सहकारी बँकेचे उपाध्यक्ष महेश चांडक, स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाचे अध्यक्ष के. विश्वनाथन नायर, कार्याध्यक्ष रमेश बनगोंडे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. आनंद रायचूर यांनी, अर्थविषयक ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त केले. महेश चांडक यांनी, शिवाजीमहाराज व्याख्यानमाला ही आता एक सांस्कृतिक परंपरा झाली आहे, असे गौरवोद्गार काढले.

डॉ. शैलेंद्र देवळाणकर पुढे म्हणाले, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे मुळात व्यापारी आहेत. त्यामुळे प्रत्येक निर्णय घेताना त्यात वाटाघाटी करायची त्यांची मानसिकता आहे. चीन, कॅनडा, मेक्सिको आणि भारत हे अमेरिकेचे प्रमुख निर्यातदार देश आहेत. यापैकी ट्रम्प हे चीनला प्रतिस्पर्धी मानतात. भारत आणि अमेरिका हे मित्रराष्ट्र असून चीन हा दोघांचाही शत्रू आहे. त्यामुळेच टॅरिफ वाढवून चीनला शह देण्याचा तसेच चीनला पर्याय म्हणून भारताला बळ देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. याशिवाय ३६ ट्रिलियन डॉलर एवढे कर्ज अमेरिकेच्या डोक्यावर असून केवळ व्याजापोटी प्रतिवर्षी १ ट्रिलियन डॉलर एवढी रक्कम अमेरिकेला चुकवावी लागते. अमेरिकेत वाढलेली बेकारी, अमेरिकन वस्तूंची देशांतर्गत ढासाळलेली बाजारपेठ आणि अवैध परकीय नागरिक या समस्यांमुळे



अमेरिकेत असंतोष वाढला आहे. यांवर उपाय म्हणून ट्रम्प यांनी नोकरशाहीवर नियंत्रण आणून प्रशासकीय खर्चात मोठी कपात केली. टॅरिफ वाढविल्याने आयातीवर पायबंद बसेल तसेच अमेरिकन वस्तूंची मागणी वाढेल, अशी ट्रम्प यांची अपेक्षा आहे. या पार्श्वभूमीवर भारताच्या आंतरराष्ट्रीय धोरणात आमूलाग्र बदल झाला आहे. जी-२० सारख्या आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन त्यासाठी साहाय्यभूत ठरले. एस. जयशंकर यांनाही या गोष्टीचे श्रेय जाते. पंतप्रधान यांनी आपल्या अकरा वर्षांच्या कारकिर्दीत सुमारे ९० देशांना भेटी दिलेल्या आहेत. आपल्या प्रत्येक भेटीतून ते विविध कराराद्वारे भारतात गुंतवणूक आणत असतात. १२३ निरनिराळ्या देशांमध्ये सुमारे साडेतीन कोटी भारतीय नागरिक राहतात. त्यांच्या माध्यमातून सुमारे १०० अब्ज डॉलर एवढा निधी भारताला विविध कारणांनी मिळतो. सातत्याने सहा टक्के किंवा त्याहून अधिक विकासदर गाठणारा भारत हा जगातील एकमेव देश आहे. करोना आणि रशिया - युक्रेन युद्ध यामुळे सुमारे ७२ देशांच्या अर्थव्यवस्था देशोधडीला लागल्या; परंतु रशिया भारताचा प्रमुख तेल पुरवठादार देश झाल्याने आपल्याकडील पेट्रोल, डिझेलच्या किमती नियंत्रणात राहिल्या. उलटपक्षी रशियाकडून कच्चे तेल आयात करून ते रिफाइंड करून भारत अन्य देशांना निर्यात करतो. पहलगाम येथील पाकपुरस्कृत दहशतवादी हल्ला हा जम्मू काश्मीर येथील पर्यटन खंडित व्हावे यासाठी केला गेला.



## शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत मनपा शाळेच्या कैलास टेकाळे यांचे सुयश

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी**

शालेय शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य, पुणेच्या वतीने महाराष्ट्रातील शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा २०२३ मध्ये घेण्यात आली होती. या स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या शिक्षकांना चांगले यश मिळाले. मनपा शिक्षकांमधून केंद्रीय प्राथ. व माध्य. विद्यालय नारेगावचे सहशिक्षक कैलास टेकाळे यांना भाषाविभाग इयत्ता सहावी ते आठवी तालुकास्तर प्रथम क्रमांक आणि जिल्हास्तरावरील द्वितीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. त्यांचा रोख रक्कम, प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा ता.३० एप्रिल रोजी मौलाना आझाद संशोधन केंद्र येथे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते पार पडला. यावेळी जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्या सान्वी देशमुख, शिक्षणाधिकारी माध्यमिक अश्विनी लाठकर, मांटे सर, श्रीमती जहागीरदार, श्रीमती भालेराव यासह प्रमुख पाहुणे उपस्थित होते. शिक्षकांनी बनवलेल्या दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओंचा अध्ययन अध्यापनात उपयोग करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले. महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी भारत तिनगोटे, विस्तार अधिकारी रामनाथ थोरे, शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे आदींनी कैलास टेकाळे यांचे अभिनंदन व कौतुक केले.

## पाथर्डी तालुक्यात बीएसएनएलच्या मोबाईल सेवेचा उडाला बोजवारा

### खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून उठवणार संसदेत आवाज

**पाथर्डी | नितीन गटाणी**

जुनाट यंत्र सामुग्री व ठिकठिकाणी चाललेल्या रस्त्याच्या कामांमुळे तुटलेल्या केबल्स दुरुस्त करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ नसल्यामुळे शहरातील बीएसएनएल मोबाइल सेवेचा पुरता बोजवारा उडाला आहे. त्यामुळे अन्य कंपन्यांचे सीमकार्ड घेण्याकडे ग्राहकांचा कल वाढला आहे. गेल्या काही महिन्यांपासून बीएसएनएलच्या मोबाईल सेवेमध्ये वारंवार व्यत्यय येत आहे. शहराच्या विविध भागांमध्येही समान रेंज मिळत नाही. तक्रारींचीही दखल घेतली जात नाही. प्रत्यक्ष बीएसएनएल ऑफिसमध्ये जाऊन बसले तरी रेंज कमी जास्त होते.

कसबा विभागात तर घराबाहेर येऊन बोलावे लागते. याच कंपनीकडून अन्य कंपन्यांनी मोबाईल सेवेसाठी टॉवर घेतले त्यांचा पुरवठा मात्र निरंतर सुरू आहे. बीएसएनएलच्या सेवेकडे मात्र कोणाचेही लक्ष नाही. स्थानिक पातळीवर कार्यालयामध्ये तक्रारीसाठी असलेला फोन उचलला गेला तर ग्राहकांच्या दृष्टीने तो भाग्याचा क्षण समजला जातो. केवळ एक अधिकारी येथे बसून ग्राहकांची समजूत काढतात. वरिष्ठ अधिकारी तालुक्याच्या प्रश्नाकडे फारसे गांभीर्याने पहात नाहीत. अपुरी साधनसामुग्री असल्याने आम्ही काही करू शकत नाही, असे ठराविक उत्तर दिले जाते.

तालुक्यात मढी, मोहटादेवी, वृद्धेश्वर, हनुमान टाकळी, भगवानगड अशी प्रमुख देवस्थाने आहेत. राज्याच्या विविध भागातून येथे भाविक येतात. मोबाईल सेवेसाठी मात्र त्यांना इतर कंपन्यांचा आधार घ्यावा लागतो. बीएसएनएलची फोर जी सेवा म्हणजे निव्वळ बुजगावणे ठरले आहे. पाथर्डीतील ऑफिसमध्ये सिमकार्ड रूपांतरीत करण्यासाठी माणसे सापडत नाहीत. बाहेर पैसे देऊन कार्ड रुपांतरीत करून घ्यावे लागते. याबाबत अधिकारी, पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी तक्रार करूनही वरिष्ठ अधिकारी दाद देत नाहीत. त्यामुळे खासदार निलेश लंके यांच्यामार्फत संसदेमध्ये पाथर्डी तालुक्यातील बीएसएनएल सेवेच्या उडालेल्या बोजवाऱ्याकडे लक्ष वेधण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनी घेतला आहे. जिथे रस्त्याची कामे चालू आहेत तेथे आम्हाला कळवले जात नाही. ठेकेदार अत्याधुनिक यंत्रसामग्रीने रस्ते उखडतात. कर्मचारी सांगतात की, सेवा बंद पडल्यानंतर आम्हाला काहीतरी घोटाळा झाल्याचे समजते. करंजी घाट, शेवगाव रस्ता, पाथर्डी शहरातील पिण्याच्या पाण्याच्या योजना, भूमिगत गटारी योजना, पालिकेची विकास कामे यासाठी ठेकेदाराकडून यंत्रसामुग्री वापरली जाते. दोन विभागांमध्ये समन्वय नसल्याने ग्राहकांचे मात्र अतोनात हाल होत आहेत.

गेल्या आठ दिवसांपासून केबल तुटली या कारणासाठी ग्राहकांना प्रभावी सेवा मिळत नाही. मोहटादेवी व वृद्धेश्वर देवस्थानकडून अनेक वर्षांपासून स्वतंत्र टॉवरची मागणी होत आहे. उत्पन्नाची साधने असलेल्या ठिकाणी कंपनीचे लक्ष नाही. सुलभ दळणवळण व्यवस्था मिळत नसल्याने तालुक्याचाही आर्थिक विकास मंद गतीने होत आहे. याबाबत तातडीने सुधारणा न झाल्यास कुठल्याही क्षणी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते बंडू पाटील बोरुडे, तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे शहराध्यक्ष देवा पवार आदींनी दिला.

# तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाचा बुद्धविहार तेथे बुध्दरुप उपक्रम

## शिरुर कासारला भव्य बुध्दरुप दान

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरातील तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाच्या वतीने बुद्धविहार तेथे बुध्दरुप हा उपक्रम हाती घेण्यात आला असून, याअंतर्गत भव्य बुध्दमुर्ती समाजबांधवांना बुद्ध विहारासाठी विनामूल्य उपलब्ध करून देण्याचे कार्य सुरू आहे. सोसायटीचे अध्यक्ष संजय कांबळे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरु असून, शिरुर कासार (ता. आष्टी, जि. बीड) येथे भव्य बुध्द रुप दान करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक येथे पार पडलेल्या या सोहळ्याला खासदार निलेश लंके यांनी उपस्थित राहून तथागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाच्या माध्यमातून सुरु असलेल्या धार्मिक व सामाजिक कार्याचे कौतुक केले. भंन्ते धम्मपाल व भंन्ते नागसेन यांनी बुध्दवंदनेने



कार्यक्रमाची सुरुवात केली. याप्रसंगी संजय कांबळे, डॉ. सिताताई भिंगारदिवे, गौतमी भिंगारदिवे, माजी नगरसेवक राहुल कांबळे, डॉ. वानखडे, डॉ. विश्वास गायकवाड, प्रा. रमेश पगारे, ग्रामपंचायत सदस्स सुनिल जाधव, शेखर पंचमुख, शिवाजी भोसले, अशोक बागुल, आण्णा गायकवाड, संगीता घोडके, अनिता पंडित, कुसुम भिगारदिवे, लता भिंगारदिवे, मायाताई जाधव, सरिता गांगुर्डे, अविनाश भोसले, युवराज सोनवणे, विजय कांबळे, सुरेश पानपाटिल, बाळासाहेब बनकर, प्रमोद शिंदे, संतोष गायकवाड, शाम वाघचौरे, संदिप वाघमारे, भरत शिरसाठ, बाळू गायकवाड, सुभाष कांबळे, नितिन साळवे, विजय साळवे, संतोष कांबळे, मिलिंद आंग्रे, सिध्दांत कांबळे, विष्णू ठोंबे, सुरेश भिंगारदिवे, जिवा कांबळे, अनिकेत भिंगारदिवे, प्रकाश कांबळे, धोडिंबा राक्षे, राम गायकवाड, शांताराम बनसोडे, प्रशांत शिंदे, भिमराज शिंदे, शिवचरण लाल, शरद बनसडे आदींसह समाजबांधव व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

संजय कांबळे म्हणाले, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी असलेले बुद्ध विहार सक्षम करुन समाज जोडण्याचे काम थागत बुद्धिस्ट सोसायटी इंडियाने हाती घेतले आहे. प्रत्येक बुद्ध विहारात चांगल्या पध्दतीने भव्य असे बुध्द रुप असणे आवश्यक आहे. अनेक बुद्ध विहारात बुध्द रुप नसल्याने ते उपलब्ध करुन देण्याचे कार्य सुरु आहे. फक्त मुर्ती नव्हे तर बुध्दांचे विचार देखील देण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून सुरु आहे. धम्माच्या जागृतीचे बीज रोवण्याचा प्रयत्न आहे. तथागत बुद्धिस्ट सोसायटी ही संस्था बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित होऊन योगदान देत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बुद्ध विहार तेथे बुध्द रुप हा उपक्रम फक्त धार्मिकतेपुरता मर्यादित नसून, तो सामाजिक ऐक्य, ज्ञानप्रसार आणि प्रेरणादायी विचारांच्या प्रसाराचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. अशा कार्यक्रमांद्वारे समाजजागृती व बौद्ध विचारांची रुजवणूक ही काळाची गरज असल्याची भावना भंन्ते धम्मपाल व भंन्ते नागसेन यांनी व्यक्त केली.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयास कर्मवीर पारितोषिक जाहीर

## अध्यक्ष खा. पवार यांच्या हस्ते सातारा येथे होणार सन्मान

**अहमदनगर । प्रतिनिधी**



शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील माध्यमिक विद्यालयास संस्थेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे सर्वोत्कृष्ट कामगिरीच्या गौरवार्थ कर्मवीर पारितोषिकनुकतेचजाहीरझाले.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६६ व्या पुण्यतिथी निमित्ताने ९ मे रोजी संस्थाध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते हे मानाचे पारितोषिक सातारा येथील कर्मवीर समाधी परिसरात होणाऱ्या कार्यक्रमात शाळेला सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. संस्थेतील सर्वाधिक गुणवत्ता प्राप्त विद्यालयाचे पुनर्मूल्यांकन करून दिला जाणारा हा सर्वोच्च गुणवत्तेचा मानाचा पुरस्कार आहे. सदर पारितोषिक मिळण्यामध्ये विद्यालयातील सर्व सेवक व विद्यार्थी यांचे योगदान आहे. विद्यालयात सर्व सेवकांना बरोबर घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने पूर्णपणे प्रयत्न केला जातो. या विद्यालयाच्या गुणवत्ता विकासाच्या वाढीसाठी संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी आमदार दादाभाऊ कळमकर यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले आहे. तसेच स्व. शंकरराव काळे यांचे या विद्यालयावर विशेष प्रेम होते. मागील कालखंडात त्यांचे विशेष योगदान या विद्यालयास मिळाल्याने विद्यालयास हे पारितोषिक प्राप्त झालेले आहे.

शाळेल पुरस्कार मिळाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा शाळा समितीचे अध्यक्ष दादाभाऊ कळमकर, संस्थेच्या उत्तर विभागीय सल्लागार मंडळाचे अध्यक्ष आमदार आशुतोष काळे, सत्यशोधक आनंदस्वामी पुस्तकाचे लेखक ज्ञानदेव पांडुळे, अर्जुन पोकळे, अभिषेक कळमकर, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, अंबादास गारुडकर, विश्वासराव काळे, कैलासराव मोहिते, विष्णुपंत म्हस्के, श्यामराव व्यवहारे यांनी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका छाया काकडे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा मार्गदर्शक शिवाजी लंके, विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी यांचे विशेष अभिनंदन करून कौतुक केले. विद्यालयास प्राप्त पुरस्कारामुळे सर्व शिक्षक व सेवक वर्गाचे अभिनंदन होत आहे.

# कर्मचाऱ्यांच्या देणग्यांचे निवारण करण्याची मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नगर तालुका सहकारी दूध व्यावसायिक व प्रक्रिया संघ मर्यादित या संस्थेच्या अवसायन प्रक्रियेला १७ महिन्यांचा प्रदीर्घ कालावधी उलटूनही अंतिम आदेश न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या वतीने विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) नाशिक येथील कार्यालया समोर साखळी आमरण उपोषण सुरु करण्यात आले आहे. तर सर्वप्रथम कर्मचाऱ्यांच्या देणग्यांचे निवारण करण्याची मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे. गुरुवारी (दि.१ मे) महाराष्ट्र दिनापासून तायगा शिंदे व गजानन खरपुडे यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या उपोषणात कुंडलिक देवकर, दत्तात्रय बेकारसे, अशोक डहाने, आप्पासाहेब ढवळे, अशोक धनगर, बाबजी शिंदे, भाऊसाहेब पळसकर, रमेश वायकर, बाबासाहेब चतुर, संभाजी निमसे, कोंडीभाऊ शेळके, बाळासाहेब थोरात, सुनिल निमसे, बाळासाहेब बेरड सहभागी झाले होते. ८ नोव्हेंबर २०२३ रोजी विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) नाशिक विभाग यांनी संघाला अवसायनात घेतल्याचे अंतरिम आदेश काढले होते. मात्र, कायद्यानुसार एक महिन्याच्या आत अंतिम आदेश अपेक्षित असतानाही आजतागायत तो आदेश न झाल्यामुळे कर्मचारी वर्गामध्ये असंतोष पसरला आहे. सदर निर्णयात माजी संचालक मंडळाने संघाचे आर्थिक नुकसान केल्याचे पुरावे असूनही त्यांच्यावर अद्याप ठोस कारवाई झालेली नाही.

# मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित अखिल भारतीय मोतीलालजी फिरोदिया खुली बुद्धिबळ स्पर्धेचे बुधवारी ता. ७ मे ते रविवारी ११ मे २०२५ पर्यंत अहिल्यानगरच्या सप्तक सदन, जुना कापड बाजार येथे आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली. या स्पर्धेत भारतातून बुद्धिबळ खेळाडू खेळण्यासाठी येणार असून आत्तापर्यंत गुजरात, आंध्र प्रदेश, दिव, दमन, गोवा, तमिळनाडू, महाराष्ट्र इत्यादी राज्यातून अडीचशेच्या वर खेळाडूंनी आपला प्रवेश निश्चित केला आहे. फीडे मास्टर वेदांत पानसरे (मुंबई), इंटर नॅशनल मास्टर राहुल सगमा (गोवा), इंटरनॅशनल मास्टर विक्रमादित्य कुलकर्णी (महाराष्ट्र) सहित अनेक दिग्गज खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत, असे अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी सांगितले.



साडेपाच वर्षाचा बाल खेळाडू तसेच ८३ वर्षाचे वयस्कर खेळाडू सुद्धा यात आपले बुद्धीचे बळ पणाला लावणार आहे असे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले.

बुधवारी ता. ७ मे रोजी सकाळी ११.३० वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार असून त्यानंतर स्पर्धा सुरू होणार आहे. या स्पर्धेत एकूण ९ फेऱ्या होणार आहेत शेवटी रविवार दि ११ दुपारी ३.०० अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते बक्षीस वितरण समारंभ होईल.

या स्पर्धेत विविध गटात प्रोत्साहन पर रोख बक्षिसे, आकर्षक ५० करंडक व सर्व खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

या स्पर्धेचे प्रमुख पंच प्रवीण ठाकरे (जळगाव) हे असून त्यांना शार्दुल टापसे (सातारा), पवन राठी सहाय्यक पंच म्हणून जबाबदारी पार पाडणार आहेत. ह्या दोघांना ६ सहाय्यक पंच मदत करणार आहेत. ही स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या नियम नियमावली नुसार होणार आहे.

तसेच या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे १०० लाकडी पट व सोंगट्या चा वापर महाराष्ट्रात पहिल्यांदा होणार आहे. अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सदस्य सुबोध ठोंबरे, परूनाथ ढोकळे, शाम कांबळे, प्रशांत गंगेकर, देवेंद्र ढोकळे, मनीष जस्वानी, प्रकाश गुजराती, चेतन कड, संजय खडके, नवनीत कोठारी, डॉ. स्मिता वाघ, शुभदा ठोंबरे, रोहिणी अडकर आदी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील आहेत. अहमदनगर शहरातील खेळाडूंनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच वरील स्पर्धेत अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी यशवंत बापट. ९३२६०९२५०१ व पारूनाथ ढोकळे ९८५०७०४२६८ यांना संपर्क करावा.

# साहित्य अकादमी भाषांतर पुरस्कार २०२५ साठी अर्ज मागविले

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

साहित्य अकादमी भाषांतर पुरस्कार वर्ष २०२५ साठी अर्ज आमंत्रण जाहीर करण्यात आले आहे. अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३१ मे २०२५ आहे. साहित्य अकादमी १९८९ पासून मान्यताप्राप्त २४ भारतीय भाषांपैकी प्रत्येकी २४ भाषांमध्ये साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार प्रदान करत आहे. साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार दरवर्षी भारतीय अनुवादकांनी आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मैथिली, मल्याळम, मणिपुरी, मराठी, नेपाळी, ओडिया, पंजाबी, राजस्थानी, संस्कृत, संथाली, सिंधी, तामिळ, उर्दू आणि तेलुगू या भाषांमध्ये अनुवादित केलेल्या उत्कृष्ट साहित्य कृतींना दिला जातो. हे पुरस्कार एका दिमाखदार समारंभात प्रदान केले जातात. पुरस्काराचे स्वरूप ५०,००० रुपये आणि ताम्रपट असे आहे. साहित्य अकादमी भारतीय अनुवादकांना, त्यांच्या हितचिंतकांना आणि प्रकाशकांना २०२५ च्या साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कारासाठी मान्यताप्राप्त सर्व २४ भारतीय भाषांमध्ये अनुवादित पुस्तके सादर करण्याचे आमंत्रण देते. २०१९, २०२०, २०२१, २०२२ आणि २०२३ मध्ये (म्हणजे १ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०२३ दरम्यान) प्रथमच प्रकाशित झालेल्या पुस्तकांचा पुरस्कारासाठी विचार केला जाईल. प्रत्येक पुस्तकाच्या १ प्रतीसह अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३१ मे २०२५ आहे. पुरस्काराची सविस्तर माहितीwww.sahitya-akademi.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

साहित्य अकादेमी




# श्री चौंडेश्वरी संस्थेचा आनंद मेळावा संपन्न

## बालगोपाळांच्या व्यवहारज्ञान वृद्धिंगतीसाठी मोठ्यांचा पुढाकार

**अहमदनगर । प्रतिनिधी**

येथील श्री चौंडेश्वरी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने शनिवारी ता.३ मे रोजी सावेडी विभागातील कोष्टी समाजाच्या बालगोपाळांना व्यवहारज्ञान वृद्धिंगत व्हावे यासाठी लहान मुलांच्या आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. आनंद मेळाव्यामध्ये सहभागी मुलांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून विक्री केली. यामध्ये क्षितिज अक्षय देखणे, शिवन्या शेखर खटावकर, संस्कृती संकेत विधाते, प्रज्वल संकेत विधाते, मुक्ता पराग खुपसे, समीक्षा महेश महादर या मुलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन आनंद मेळाव्याचा आनंद घेतला आनंद मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी वैशाली खुपसे, पुनम खटावकर, सारिका विधाते, अध्यक्ष पराग खुपसे, सचिव मनेष पंधारे, उपाध्यक्ष बाबासाहेब पांडकर, खजिनदार श्यामसुंदर दुधाने, संस्थेचे संचालक दत्तात्रय वडवणीकर, राजेंद्र विधाते, सुनील खरपे, संजीव झिरमिटे, विजय खटावकर, अशोक टेके, अक्षय देखणे, गोवर्धन देखणे यांचे विशेष सहकार्य लाभले. सावेडी येथील श्री चौंडेश्वरी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने दर महिन्याला समाजासाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, अशी माहिती अध्यक्ष अध्यक्ष पराग खुपसे यांनी दिली.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# जातनिहाय जनगणना

मागील आठवड्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. या संबंधीची घोषणा केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत केल्यानंतर संपूर्ण देशातून जातनिहाय जनगणनेचे स्वागतच करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांपासून विरोधकांसह अनेक सामाजिक संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांसह विरोधकांकडून सातत्याने जातनिहाय जनगणनेची मागणी होत होती. विशेषतः विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही मागणी सातत्याने लावून धरली होती. उशिरा का होईना पण पण जातनिहाय जनगणनेला मंजुरी देऊन सरकारने एक चांगला निर्णय घेतला. स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच जातनिहाय जनगणना होतेय हे विशेष याआधी इंग्रजांच्या काळात १८८१ ते १९३१ पर्यंत झालेल्या जनगणनेत जातींची गणना झाली होती. १९४१ च्या जनगणनेत देखील जातींची गणना करण्यात आली होती, पण त्याची आकडेवारी जाहीर करण्यात आली नव्हती.



१९५१ साली स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदा जनगणना झाली. या जनगणनेत जातनिहाय जनगणना व्हावी, अशी मागणी झाली होती मात्र तत्कालीन प्रधानमंत्री पंडित नेहरू यांनी त्यास नकार दिला. त्यांच्या मते जातनिहाय जनगणनेमुळे जातिजातीत विभाजन होऊन राष्ट्रीय एकतेला बाधा पोहचू शकते. त्यांनी जातनिहाय जनगणेस नकार दिला होता.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**

मात्र या जनगणनेत अनुसूचित जाती आणि जमातींची गणना करण्यात आली, तशी ती प्रत्येक जनगणनेत करण्यात आली कारण अनुसूचित जाती जमातींची जनगणना व्हावी, असे घटनेतच नमूद करण्यात आले आहे. अनुसूचित जाती जमातींची गणना जनगणनेत केली जाते, मात्र इतर मागासवर्गीय जातींची गणना करण्यात येत नव्हती ती आता करण्यात येईल. जातनिहाय जनगणना हा एक चांगला निर्णय आहे. ही जनगणना झाल्याने सर्व जातींची लोकसंख्या मोजण्यात येईल त्यामुळे कोणत्या जातींची किती लोकसंख्या आहे ते समजेल. १९३१ साली झालेल्या जनगणनेत मागासवर्गीय जातींची लोकसंख्या ५२ टक्क्यांहून अधिक असल्याचे सांगण्यात आले होते. मंडल आयोगाने इतर मागासवर्गाला आरक्षण देताना हीच लोकसंख्या ग्राह्य धरून इतर मागास वर्गाला २७ टक्के आरक्षण दिले. इतर मागास वर्गाची लोकसंख्या यापेक्षा अधिक आहे त्यामुळे २७ टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण मिळायला हवे अशी मागणी या वर्गाकडून होऊ लागली होती. आता ही जनगणना झाल्यामुळे सर्व जातींची लोकसंख्या मोजली जाईल. त्यामुळे यावर्गांची नाराजी दूर होईल. ही जनगणना झाल्याने आरक्षणाची जी ५० टक्के मर्यादा आहे ती देखील वाढवली जाईल. सध्या सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ५० टक्के ठेवली आहे. या जनगणनेमुळे संसद आणि विधानसभेचे चित्रही बदलू शकते. शिवाय जनगणना झाल्यावर प्रत्येक जातीच्या विकासासाठी त्यांच्या लोकसंख्येनुसार निधी उपलब्ध करून दिला जाईल. या जनगणनेमुळे प्रत्येक जातीची शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीबद्दल स्पष्टता येईल. या आकडेवारीत स्पष्टता आल्यावर सरकार त्यांच्यासाठी अधिक मजबूत धोरणे बनवू शकेल एकूणच ही जनगणना ही देशाच्या सामजिक आणि आर्थिक क्षेत्रावर दूरगामी परिणाम करणारी ठरेल. आता प्रश्न असा आहे की ही जनगणना होणार कधी ? या संदर्भातील विधेयक आगामी पावसाळी अधिवेशनात मांडले जाऊ शकते. म्हणजेच सप्टेंबरपासून या जनगणनेची प्रारंभिक प्रक्रिया सुरू होऊ शकते. मात्र प्रत्यक्ष ही जनगणना एप्रिल २०२६ पासून सुरू होण्याची शक्यता आहे. २०२१ सालीच ही जनगणना व्हायला हवी होती मात्र कोरोनामुळे ती पुढे ढकलण्यात आली. आता ती पुढील वर्षी होण्याची शक्यता आहे. जनगणना ही दर दहा वर्षांनी होते. जनगणना ही दीर्घ चालणारी प्रक्रिया आहे. प्रत्यक्ष जनगणनेचे काम जरी काही महिनेच असले तरी त्यातून येणाऱ्या आकडेवारीचे प्रामाणिकिकरण आणि प्रकाशनासाठी एक दोन वर्ष लागतात म्हणजेच या जातनिहाय जनगणनेची आकडेवारी २०२७ सालीच हाती येईल. या जनगणानेसाठी सुमारे १४ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे त्याची तरतूद आगामी अर्थसंकल्पात केली जाईल.

# विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी : ‘विद्यार्थी उत्कर्ष मंडळ’ करिअर मार्गदर्शन कार्यक्रम

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी आणि पालकांना योग्य दिशा मिळावी यासाठी मुंबई विद्यार्थी उत्कर्ष मंडळ यांच्या करिअर मार्गदर्शन केंद्रातर्फे शनिवारी ता.१० मे रोजी संध्याकाळी ६ ते ९ या वेळेत करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रम न्यू हनुमान थिएटर मंगल कार्यालय, इंडस्ट्रियल इस्टेट कंपाऊंड, डॉ. आंबेडकर रोड, चिवडा गल्ली, लालबाग, मुंबई ४०० ०१२ या ठिकाणी होणार असून प्रवेश विनामूल्य आहे. इ. १० वी व १२ वी नंतरच्या शैक्षणिक व व्यावसायिक संधींबाबत विद्यार्थ्यांना आणि पालकांना माहिती देण्यासाठी शिक्षण क्षेत्रातील मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. आयटीएम इन्स्टिट्युट ऑफ हेल्थ सायन्सेसचे संचालक डॉ. संकल्प राव प्रमुख पाहुणे असणार आहेत. यावेळी समर्थ संचालक समर्थ पालकर हे १० वी, १२ वी नंतरच्या परदेशातील करिअर संधी या विषयावर मार्गदर्शक करतील तर व्याख्याता व करिअर समुपदेशक शर्मिला लोंढे यांचा विषय असेल १० वी, १२ वी नंतरचे करिअर पर्याय, आव्हाने आणि नियोजन. कार्यक्रमाच्या अधिक माहितीसाठी मंडळ प्रमुख विकास शिंदे, करिअर मार्गदर्शन केंद्राचे प्रमुख उमेश निंबरे, करिअर मार्गदर्शन केंद्राचे सहायक प्रमुख अरुण तळगावकर यांना ९८७०४ २२९५९ / ९००४६ ७३२२४ / ९४२१७ ४६२४९ या क्रमांकांवर संपर्क साधू शकता. विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# राज्य नाट्यस्पर्धेचा गौरव सोहळा ५ मे रोजी रवींद्र नाट्यमंदिरात

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे आयोजित ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा आणि २१ व्या राज्य बालनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील विजेत्या कलाकार, तंत्रज्ञ व नाट्य संस्थांचा विभागीय पारितोषिक वितरण सोहळा सोमवारी ता. ५ मे रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला. हा सोहळा मुंबईतील रवींद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी येथे पार पडणार असून सर्व रसिकांसाठी प्रवेश विनामूल्य आहे. कार्यक्रमात प्राथमिक फेरीत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या नाट्य कलाकारांचा, तंत्रज्ञांचा तसेच नाट्य संस्थांचा गौरव करण्यात येणार आहे. नाट्य क्षेत्रातील नवोदित आणि हौशी कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी तसेच त्यांच्या प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा सोहळा सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात आला असून सर्व रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.



# क्षणिक सुखासारखी जगात दुसरी विपत्ती नाही, असे लोक भौतिक सुखाचे दास होतात- खेडकर

## सेवापूर्तीनिमित्त सत्कार

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभाग येथे कार्यरत उपअभियंता अजिनाथ खेडकर यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. सेवानिवृत्त झालेले खेडकर यांच्या सेवापूर्तीचा जिल्हा परिषद बांधकाम विभाग येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

प्रसंगी अभियंता हर्षल काकडे, किरण कदम, होले, उपअभियंता अजीनाथ खेडकर, पीपल्स हेल्पलाईनचे प्रकाश थोरात, वरिष्ठ लिपिक श्रीमती सप्तर्षी आदींसह कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. यावेळी होले म्हणाले, उपअभियंता अजिनाथ खेडकर यांनी आपल्या कामाशी प्रामाणिक राहून कार्य केले. त्यांनी सेवाकाळात नगर तालुका, राहुरी, पाथर्डी, शेवगाव, नेवासा या तालुकाच्या ठिकाणी अनेक योजना यशस्वीपणे राबवल्या ग्रामीण भागात कामे करताना त्यांनी सर्वांना बरोबर घेऊन काम केले. ते एक कुशल अभियंता असून त्यांनी त्यांच्या कामाच्या माध्यमातून सार्वजनिक बांधकाम विभागात नावलौकिक मिळवून दिल्याचे त्यांनी सांगितले. उपअभियंता अजिनाथ खेडकर म्हणाले, लोभ आणि चंगळवादाला बळी पडलेले लोक दिव्य लोकातही सुख प्राप्त करू शकत नाही. तर पृथ्वीतलावरील लोकांची काय कथा! भौतिक क्षणिक सुखा सारखी या जगात दुसरी विपत्ती नाही. भौतिक सुख मोह माये समान आहे. आणि भौतिक सुखाने ग्रस्त लोक विषय सुखाचे दास होतात.

परंतु सत्याची जाणीव झाल्यास विषय सुखाचे भय वाटते, म्हणून सुज्ञ माणसाने भौतिक सुखाची कामना करू नये असे त्यांनी सांगितले. सत्काराला उत्तर देताना अजिनाथ खेडकर म्हणाले, शासनाने आपल्यावर टाकलेल्या जबाबदारीचे भान ठेऊन लोककार्यासाठी काम केले तर अडचण येणार नाही. लोकसेवेत काम करताना सामाजिक बांधिलकी जोपासून योगदान दिल्यास त्या कामाला यश मिळणार आहे. हे मी माझ्या सेवाकार्यात अनुभवले असल्याचे त्यांनी सांगितले.

# भारताचा मुस्लिम सहकारी देश : जिबूती आफ्रिकेतील लहान पण सामरिकदृष्ट्या महत्त्वाचा मित्र






जिबूती हा आफ्रिकेतील छोटा पण सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा देश आहे. केवळ २३,००० चौरस किमी क्षेत्र आणि १०.८८ लाख लोकसंख्येसह (२०२५ अंदाज), हा देश भौगोलिक स्थान, सांस्कृतिक वैविध्य आणि भारताशी असलेल्या मैत्रीमुळे जागतिक राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावतो.

ईशान्य आफ्रिकेतील बाब-अल-मंडेब सामुद्रधुनीवर वसलेला जिबूती लाल समुद्र आणि अडेनच्या आखाताला जोडतो. सुएझ कालव्याच्या जवळ असल्याने त्याचे भौगोलिक महत्त्व प्रचंड आहे. त्याच्या सीमांना इरिट्रिया, इथिओपिया, सोमालिया आणि अडेनचे आखात भेटते. जिबूती सिटी ही देशाची राजधानी आणि प्रमुख बंदर आहे, जिथे अनेक देशांनी आपले सैन्यतळ उभारले आहेत.



**भैरवनाथ वाकळे**
संपादक, रयत समाचार
९४०५४०१८००
**विश्ववार्ता**

जिबूतीचा भूगोल डोंगर, वाळवंट आणि किनारी भागांनी नटलेला आहे. येथील लेक असाल हा आफ्रिकेतील सर्वात खोल बिंदू (समुद्रसपाटीपासून १५५ मीटर खाली) आहे, तर अर्डोकुबा ज्वालामुखी आणि लेक अबे येथील चुनखडीचे स्तंभ पर्यटकांसाठी आकर्षण ठरतात. जिबूतीचा इतिहास प्राचीन व्यापाराशी निगडित आहे. भारतीय व्यापारी येथे मसाले, रेशीम आणि सोन्यासाठी येत. १९व्या शतकात फ्रेंचांनी यावर वर्चस्व मिळवले आणि १८९६ मध्ये याला ‘फ्रेंच सोमालिलँड’ नाव दिले. १९७७ मध्ये जिबूतीला स्वातंत्र्य मिळाले. सध्या राष्ट्राध्यक्ष इस्माईल ओमर गुएल्ले १९९९ पासून सत्तेवर आहेत.

जिबूतीची लोकसंख्या मुख्यतः सोमाली (६०%) आणि अफार (३५%) समुदायाची आहे. फ्रेंच आणि अरबी या अधिकृत भाषा, तर सोमाली आणि अफार राष्ट्रीय भाषा आहेत. इस्लाम हा प्रमुख धर्म असून ९४% लोक मुस्लिम आहेत. येथील संस्कृती सोमाली, अफार आणि अरबी प्रभावांनी समृद्ध आहे.

या देशाची अर्थव्यवस्था बंदर सेवा, लॉजिस्टिक्स आणि परदेशी सैन्यतळांवर अवलंबून आहे. अमेरिका, चीन, फ्रान्स, जपान आणि इटलीचे सैन्यतळ येथे आहेत. जिबूती फ्रँक हे चलन आहे. २०२५-२६ मध्ये आर्थिक विकास दर ५.४% राहण्याचा अंदाज आहे.

भारत आणि जिबूती यांचे संबंध प्राचीन काळापासून आहेत. गुजरात आणि केरळमधील व्यापारी येथे येत असत. १९६९ मध्ये भारताने जिबूतीत मानद वाणिज्य दूतावास सुरू केला, तर २००४ मध्ये जिबूतीने दिल्लीत दूतावास उघडला. २०१५ च्या ‘ऑपरेशन राहत’ दरम्यान जिबूतीने यमनमधून भारतीयांना वाचवण्यासाठी मदत केली. २०१७ मध्ये राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी जिबूतीला भेट दिली. दोन्ही देशांमध्ये नौदल प्रशिक्षण आणि संरक्षण सहकार्य वाढले आहे. २०२२-२३ मध्ये भारताने जिबूतीला १.१६ अब्ज डॉलर्सची निर्यात केली, ज्यात तांदूळ, साखर, अभियांत्रिकी वस्तू आणि कापडाचा समावेश आहे. कोविड-१९ काळात भारताने २४,००० लस डोस आणि ५० मेट्रिक टन अन्नधान्याची मदत केली. ‘’ आणि ‘’ कार्यक्रमांतून जिबूतीच्या विद्यार्थ्यांना भारतात शिक्षणाची संधी मिळते. जिबूती पर्यटकांसाठी खास आहे. लेक अबे येथील चुनखडीचे स्तंभ, लेक असाल सरोवर, अर्डोकुबा ज्वालामुखी आणि मूचा आयलंड येथील व्हेल शार्कसह स्नॉर्केलिंग ही प्रमुख आकर्षणे आहेत. नोव्हेंबर ते मार्च हा पर्यटनासाठी उत्तम काळ आहे, कारण मे ते सप्टेंबर दरम्यान तापमान ४२ सेल्सिअसपर्यंत पोहोचते.

जिबूती भले लहान असला, तरी त्याचे सामरिक स्थान, सांस्कृतिक वैविध्य आणि भारताशी असलेली मैत्री यामुळे तो जागतिक स्तरावर महत्त्वाचा आहे. भारत आणि जिबूती यांचे सहकार्य भविष्यात आणखी दृढ होईल, ज्याचा दोन्ही देशांना फायदा होईल. भारतीय पर्यटकांनी या अनोख्या देशाला अवश्य भेट द्यावी!

# शिक्षणमहर्षी मौलाना गुलाम वस्तानवी यांचे कार्य

अक्कलकुवा येथील मदरसाचे प्रमुख मौलाना गुलाम वस्तानवी यांचे काल दुःखद निधन झाले. मुस्लिम समाजासाठी त्यांनी भरीव कार्य केले. त्यांच्या कार्याचा अल्पसा परिचय करून देणारा हा लेख. शिक्षणमहर्षी मौलाना गुलाम वस्तानवी... मौलाना गुलाम मोहम्मद वस्तानवी यांचा जन्म गुजरातच्या सूरत जिल्ह्यातील कोसाडी या गावात १ मे १९५० रोजी झाला होता. साधरणतः १९५३ किंवा ५३ साली त्यांचे कुटुंबिय त्याच जिल्ह्यातील वस्तानवी या गावी स्थलांतरित झाले. त्यांनी आयुष्यभर धारण केलेले वस्तानवी हे आडनाव त्यांच्या मातृभूमीशी असलेली त्यांची नाळ दर्शविते. मौलाना वस्तानवी यांचे सुरुवातीचे शिक्षण कोसाडी येथील मदरसा कुवत-उल-इस्लाम येथे झाले, जिथे त्यांनी कुराण हिफ़्ज़ म्हणजेच कंठस्थ (तोंडपाठ) केले. यानंतर त्यांनी बडोद्यातील मदरसा शम्स-उल-उलूम येथे शिक्षण घेतले आणि १९६४ पासून गुजरातमधील ताड़केश्वर येथील मदरसा फ़लाह-ए-दारैन येथे पुढील शिक्षण घेतले. तसेच, १९७२ च्या उत्तरार्धात, वस्तानवी यांनी उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथील मजाहिर उलूममध्ये प्रवेश घेतला. तेथे त्यांनी मुहम्मद युनूस जौनपुरी सारख्या विद्वानांकडून हदीससह प्रगत इस्लामिक विज्ञानांचा अभ्यास केला. त्यांनी १९७३ मध्ये आपले शिक्षण पूर्ण केले. त्यांनी इस्लामिक अभ्यासाव्यतिरिक्त, एमबीएची पदवी देखील मिळवली. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, मौलाना वस्तानवी यांनी १९७९ मध्ये महाराष्ट्रातील अक्कलकुवा येथे जामिया इस्लामिया इशातुल उलूम या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. सुरुवातीला, ही संस्था अत्यंत मर्यादित संसाधनांसह कार्यरत होती, ज्याची सुरुवात एका छोट्या ठिकाणी झाली होती. अवघे सहा विद्यार्थी आणि एक शिक्षक येथून या संस्थेचा प्रवास सुरु झाला होता. कालांतराने, ही संस्था लक्षणीयरीत्या विस्तारली आणि त्याचे रूपांतर एका वटवृक्षात झाले. इस्लामिक आणि समकालीन आधुनिक शिक्षणाचे मिश्रण करणारी एक उल्लेखनीय संस्था उदयास आली. संस्थेचे प्रभावीपणे व्यवस्थापन करण्यासाठी मौलाना वस्तानवी कायमचे अक्कलकुवा येथे स्थायिक झाले. या संस्थेमध्ये प्राथमिक आणि उच्च माध्यमिक शाळा, शिक्षण पदवी (बी.एड.) आणि शिक्षण पदविका (डी.एड.) महाविद्यालये तसेच व्यावसायिक कार्यक्रमांचा समावेश आहे. अभियांत्रिकी, फार्मसी आणि एमसीआयने मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय असे व्यावसायिक अभ्यासक्रम देखील दिले जातात. मौलाना वस्तानवी यांनी स्थापन केलेले, जालना जिल्ह्यातील बदनापुर येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स अँड रिसर्च हे वैद्यकीय महाविद्यालय आज दिमाखात उभे असून रुग्णसेवेसह डॉक्टरांची निर्मिती करीत आहे. याव्यतिरिक्त मौलाना यांची संस्था आयटी, ऑफिस व्यवस्थापन, टेलरिंग आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट यासारख्या क्षेत्रात व्यावसायिक प्रशिक्षण प्रदान करते. या मिश्रित शिक्षण मॉडेलचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना धार्मिक आणि समकालीन सामाजिक भूमिकांसाठी तयार करणे आहे. १९९८ मध्ये मौलाना वस्तानवी जगप्रसिद्ध दारुल उलूम देवबंद या बलाढ्य आणि प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिलचे (मजलिस-ए-शुरा) सदस्य बनले आणि त्यांच्या कार्यकाळात त्यांनी कुलगुरू म्हणूनही काम केले. ११ जानेवारी २०११ रोजी वस्तानवी यांची दारुल उलूम देवबंदचे कुलगुरू म्हणून निवड झाली होती. परंतु, गुजरात दंगलीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी केलेल्या एका वक्तव्यावरुन वाद निर्माण होऊन काही महिन्यातच त्यांना देवबंदच्या कुलगुरु पदावरुन पायउतार व्हावे लागले होते.मौलाना गुलाम मोहम्मद वस्तानवी साहेब यांनी धार्मिक शिक्षणाला आधुनिक शिक्षणाची, विज्ञानाची, तंत्रज्ञानाची जोड़ देत हज़ारों, लाखो विद्यार्थी घडविले ज्यांच्याजवळ धार्मिक ज्ञानासह जगाशी स्पर्धा करण्याचे कौशल्य होते. या व्यतिरिक्त वस्तानवी यांनी देशभरात अनेक सामाजिक, धार्मिक संस्था स्थापन केल्या, अनेक संस्थांन सढळ हाताने मदत केली, मदत मिळवून दिली. हज़रत मौलाना वस्तानवी यांच्या शैक्षणिक कार्याची तुलना महान शिक्षणमहर्षी सर सैयद अहमद खान यांच्याशी करता येईल. ज्याप्रमाणे सर सैयद अलीगढ़ मुस्लिम विद्यापीठ स्थापन करत मुस्लिम समाजाला आधुनिक शिक्षणाची दारे उघडून दिली, त्याच प्रमाणे मौलाना वस्तानवी यांनी नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा येथे जामिया इस्लामिया इशातुल उलूम ही संस्था उभारत मुस्लिमांना धार्मिक शिक्षणासह जागतिक स्पर्धेत टिकणारे शिक्षण देण्याची मोठी कामगिरी बजावली. भावी पिढ्यांसाठी एक मोठा शैक्षणिक वारसा मागे ठेवत आज हज़रत मौलाना गुलाम वस्तानवी साहेब आपला इहलोकाचा प्रवास संपवत आपल्या खऱ्या-खुऱ्या मालकाकड़े मार्गस्थ झाले... इन्ना लिल्लाहि व इन्ना इलैही राजिऊन... अल्लाह त्यांना सर्व चुकांपासून मुक्त करून मुक्ती देवो... आणि, त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक, सामाजिक संस्था क़यामतपर्यंत बहरत राहो.



**सलीमखान पठाण**
श्रीरामपूर
---------
**प्रासंगिक**

Friends of Rayat Samachar
इंडी जर्नल वाचण्यासाठी
QR code scan करा